**प्रेसनोट** दिनांक—२२/०२/२०२५

पो.उप.निरी.राजेश केशवराव डोंगरे, नेमणुक—कोनगांव पोलीस स्टेशन, भिवंडी, ठाणे शहर यांना यशस्वी सापळा कारवाई करून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे यांनी ताब्यात घेतले.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | **ठाणे** |
| स्टेशन डायरी नोंद क्रमांक | कोनगावं पो.स्टे. ठाणे शहर पोलीस आयुक्तालय, ठाणे दैनंदिनी नोंद क्र. २७/२०२५, वेळ १८:२६ वा. |
| लोकसेवकाचे नाव व कार्यालय | राजेश केशवराव डोंगरे, पो.उप.निरी., नेमणुक—कोनगांव पोलीस स्टेशन, भिवंडी, ठाणे शहर |
| मागितलेली लाचेची रक्कम | प्रथम रू.८००००/—रू. तडजोडीअंती २५,०००/— रूपये लाचेची मागणी करून **पडताळणी दरम्यान तडजोडीअंती** |
| **तडजोडीअंती स्वीकारलेली लाचेची रक्कम** | **१०,०००/—रू.** |
| थोडक्यात हकिकत | यातील तक्रारदार यांनी दि. २०/०२/२०२५ रोजी अँन्टी करप्शन ब्युरो ठाणे येथे दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या पडताळणीमध्ये लोकसेवक श्री राजेश केशवराव डोंगरे, वय— ३४ वर्षे, पोलीस उप निरीक्षक, कोनगांव पोलीस स्टेशन यांनी कोनगांव पोलीस स्टेशन गुन्हा रजि. नं. ८७/२०२५ भा. न्या. सं. कलम १०९,११८(१), ३५२ प्रमाणे दाखल गुन्हयामध्ये यातील तक्रारदार यांस आरोपी न करणेकरीता ८०,०००/—रु लाचेची मागणी करुन तडजोडीअंती २५,०००/—रु लाचेची मागणी केलेबाबत दिलेल्या तक्रारीचे अनुषंगाने आज दि. २२/०२/२०२५ रोजी करण्यात आलेल्या पडताळणीमध्ये लोकसेवक श्री राजेश डोंगरे पोउपनिरी यांनी तक्रारदार यांचेकडुन तडजोडीअंती १०,०००/—रु लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.<br>त्यानुसार लागलीच आज दि. २२/०२/२०२५ रोजी करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक श्री. राजेश डोंगरे यांनी तक्रारदार यांचेकडुन मागणी केलेली १०,०००/—रु लाचेची रक्कम पंच साक्षीदार यांचे समक्ष स्विकारल्याने सापळा पथकाने लोकसेवक राजेश डोंगरे, पोलीस उप निरीक्षक यांना १४:४० वा. लाचेच्या रक्कमेसह ताब्यात घेण्यात आले असुन पुढील गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही सुरू आहे. |

मार्गदर्शक अधिकारी:— श्री.शिवराज पाटील, पोलीस अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे.
श्री.सुहास शिंदे, अपर पोलीस अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे.
श्री.संजय गोविलकर, अपर पोलीस अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे.

---

लाचलुचपत प्रतिबंधक विभागा तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारा संबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवका बद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे परिक्षेत्र, ठाणे यांचेशी संपर्क करावा

संपर्क पत्ता :— ला.प्र.वि.ठाणे मध्यवर्ती कारागृहा समोर, ठाणे पश्चिम ४००६०१
संकेतस्थळ :— acbmaharashtra@mahapolice.gov.in
ई—मेल :— spacbthane@mahapolice.gov.in
ऑनलाईनतक्रार ॲप्लीकेशन :— acbmaharashtra.net
टोलफ्रीनं :— १०६४
दुरध्वनीक्र. :— ०२२—२०८१३५९८/२०८१३५९९
व्हॉटसअॅपक्र. :— ९९३०९९७७००

(प्राजक्ता राजेकुमार)
पोलीस उप अधीक्षक,
अँन्टी करप्शन ब्युरो,ठाणे.